# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

फोन नं).०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, Email – purchase@sai.org.in)


## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागासाठी कार्यालयीन स्टेशनरी साहित्य खरेदीकामी पुरवठाधारक, वितरक, नामांकित उत्पादक कंपन्या यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी-शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.१६/ ०१ /२०२० रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.२७/ ०१ /२०२० सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदाधारकास साहित्य पुरवावयाची हमी म्हणून रु. १३,०००/- (अक्षरी रु. तेरा हजार) मात्र बयाणा रक्कम व निविदा फी रु. २,६००/- (अक्षरी रु. दोन हजार सहाशे मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर online भरावी लागेल. MSME अंतर्गत निविदेसाठीची बयाणा रक्कम व निविदा फी भरण्याची सवलत सदर ई- निविदेसाठी लागू नाही.

४. निविदाधारकाने सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि. २९/ ०१ /२०२० रोजी उघडण्यात येतील.

६. कोणतीही निविदा अंशत/ पुर्णपणे स्वीकारणे किंवा नाकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

(दी.म. मुगळीकर, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Scanned by CamScanner

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**


दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail:- purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय** - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


## श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागासाठी सन २०१९-२० करीता कार्यालयीन स्टेशनरी साहित्य खरेदीकामी

## ई-निविदा

Scanned by CamScanner

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
## निविदाधारकांसाठी सूचना

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

२. निविदाधारकास साहित्य पुरवावयाची हमी म्हणून रु. १३,०००/- (अक्षरी रु. तेरा हजार) मात्र बयाणा रक्कम व निविदा फी रु. २,६००/ (अक्षरी रु. दोन हजार सहाशे मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर online भरावी लागेल.

३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांची राहील. अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४. सदर निविदा दि.१६-०७-२०२० रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.२८-०७-२०२० सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

**५. ई-निविदेसोबत फक्त मागणी केलेली कागदपत्रे Online सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

६. कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्विकारणेचा किंवा नाकारणेचा अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

७. सदर ई-निविदेतील साहित्याचे वर्णन व कंपनी/ ब्रँड हे BOQ मध्ये नमूद करण्यात आलेले आहेत. ते विचारात घेऊनच ई-निविदा भरावी.

८. ई-निविदा भरतांना GST, TDS व इतर शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई, हमाली व वाहतूक वगैरे सर्व खर्चासह संस्थानचे भांडार विभागात पोहचचे सर्व समावेशक दर नमूद करावेत.

९. सदर ई- निविदेसाठी MSME अंतर्गत निविदा भरण्यासाठी बयाणा रक्कम व निविदा फी भरण्याची सवलत लागू नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०. शक्य झाल्यास दि.२९/०७/२०२० रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात येतील.

११. तांत्रिक निविदेत पात्र ठरणाऱ्या निविदाधारकास Commercial Bid उघडण्याचे दिवशी बोलविण्यात येईल याकामी मोबाईल/ टेलीफोन वर कळविण्यात येईल.

**(दी.म. मुगळीकर, भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी**



Scanned by CamScanner

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
**शिर्डी– ४२३ १०९. तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर**

## निविदेच्या शर्ती व अटी

१. पुरवठा करावयाचे साहित्याचे वर्णन व कंपनी/ ब्रॅंड हे BOQ मध्ये नमूद करण्यात आलेले आहेत. ते विचारात घेऊनच ई-निविदा online भरावयाची आहे.

२. निविदाधारकास निविदेसोबत निविदा फी रक्कम रु. २,६००/- (अक्षरी रुपये दोन हजार सहाशे मात्र) व बयाणा रक्कम रु. १३,०००/- (अक्षरी रुपये तेरा हजार मात्र) www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर online भरावी लागेल.

३. अद्यावत दुकान नोंदणी दाखला/स्थनिक स्वराज्य संस्थेचा दाखला/शासकीय उत्पादक परवाना अगर तत्सम शासकीय परवाना, GST नोंदणी सर्टिफिकेट/ऑनलाईन जीएसटी नोंदणी पावती, पॅनकार्ड, इ. सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

४. साहित्याचे दर भरतांना जीएसटी दराचा बोजाचा विचार करुनच निविदा सादर करावी. निविदाधारकाने सदरचे दर हे शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई, हमाली व वाहतूक वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार विभागात पोहोचचे वाहतुक खर्चासह सर्व समावेशक नमूद करावेत. कुठलाही खर्च वेगळा आदा केला जाणार नाही.

५. शासन नियमानुसार वेळोवेळी लागु होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातुन कपात करण्यात येईल. शासनाने ०१ ऑक्टोबर २०१८ पासुन करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं. २०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्यानुसार लागू असल्यास संस्थानकडुन बीलातुन टॅक्स वसुल केला जातो. त्याचाही निविदाधारकांनी निविदा भरतांना विचार करावा. याबाबतची अधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्धआहे.

६. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत साहित्याचा पुरवठा करावयाची हमी म्हणून पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर १५ दिवसाचे आत सदर रकमेचा भरणा संस्थानकडे करावा लागेल सुरक्षा अनामत रक्कम साहित्याचा पुरवठा पुर्ण केल्यानंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

७. न्युनतम दरधारक निविदाकारांची ई- निविदे सोबत भरलेली बयाणा रक्कम ही प्रसंगी सुरक्षा अनामत खात्यात वर्ग करण्यात येईल व पुरवठा पुर्ण केल्यानंतर सदरची रक्कम परत करण्यात येईल याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

८. निविदा मंजूर झालेनंतर शिर्डी येथे येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकांस आदा करावी लागेल.

९. ज्या साहित्याच्या निविदा मंजुर होतील ते साहित्य मान्य झालेल्या कंपनीचे दर्जा पुरवावे लागेल. कमी दर्जाचे, वेगळ्याच कंपनीचे साहित्य स्विकारले जाणार नाही. अशा साहित्याचा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

१०. वरील ६ व ८ च्या अटीची पूर्तता केलेनंतर संस्थानकडून साहित्याचा पुरवठा आदेश दिला जाईल.



Scanned by CamScanner

**११. साहित्याचा पुरवठा हा पुरवठा आदेश दिलेनंतर तात्काळ किंवा ९० दिवसांत करावा लागेल.**

१२. निविदाधारकाने पुरविलेले साहित्य संस्थानचे निविदेतील व पुरवठा आदेशातील वर्णन व कंपनीप्रमाणे नसल्याने नाकारल्यास व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून साहित्याची खरेदी करावी लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या साहित्याच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

१३. ई- निविदेतील साहित्य कंपनी/स्पेसिफिकेशनबाबत शंका असल्यास निविदाधारकाने याबाबत खरेदी विभागाकडे ०२४२३-२५८७७१/७२ या दुरध्वनीवर संपर्क करुन निविदा भरण्यापुर्वी शंका निरसन करुन online दर भरावेत. नंतर याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही.

**१४. पुरवठा केलेले साहित्य भांडार विभागाने स्विकारलेनंतर तपासणी करुन त्यांचे अभिप्रायानुसार साधारण १ महिन्याचे आत बील आदा करण्याचा प्रयत्न राहील. साहित्याच्या पुरवठ्याबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.**

१५. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१६. शासन नियमानुसार लागू असलेल्या व लागु होणाऱ्या सर्व कर कपाती बिलातून करण्यात येतील.

१७. ई- निविदेतील/ पुरवठा आदेशातील कंपनीच्या व वर्णनाच्या साहित्याचा पुरवठा करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठादाराची राहील व त्याप्रमाणेच साहित्याचे बील द्यावे लागेल.

१८. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी (Technical Bid) उघडल्यानंतर १८० दिवसांचा राहील.

१९. राज्याबाहेरील निविदाधारकाची निविदा मंजूर झाल्यास शासन खरेदी नियमावलीतील नियम क्रं.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकाच्या दरात साहित्य पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या साहित्याच्या ५०% साहित्याचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादारांना देण्यात येतील व जर ते तयार नसतील तर पुर्ण साहित्याचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादारांना देण्यात येईल.

**२०. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.**

२१. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी (Deviation Sheet) संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, असे Deviation Sheet विचारात घेतले जाणार नाहीत.

२२. पुरवठा कालावधीत संस्थानला आवश्यकता भासल्यास पुरवठा आदेशातील परिमाणाच्या २५% साहित्य मान्य न्युनतम दरानेच पुरवठा करणे पुरवठादार यांचेवर बंधनकारक राहील.

**आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

२३. साहित्य पुरविणेचा पुरवठा आदेश दिलेनंतर, त्याप्रमाणे साहित्याचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे त्या नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक इतके अथवा पुरवठा आदेशाइतके साहित्य दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या साहीत्यासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या साहित्याच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

..३...

Scanned by CamScanner

२४. पुरवठाधारक यांनी पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन साहित्य खरेदी करावे लागल्यास याकामी जादा येणाऱ्या खर्चाची नुकसान भरपाई म्हणुन पुरवठा आदेश रद्द करुन पुरवठाधारक यांची जमा सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल. तसेच याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी/ मा. स्थानिक उपसमिती/ मा. व्यवस्थापन समिती/ मा. तदर्थ समिती सभा घेईल तो निर्णय पुरवठाधारक यांचेवर बंधनकारक राहील. तसेच पुरवठादाराने online निविदेत दर भरतांना काळजी पुर्वक भरावेत नजरचुकीने दर भरले आहेत अशा सबबी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२५. निविदेतील मंजुर दराने साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने साहित्याचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा साहित्याचा पुरवठा न केल्यास संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२६. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.

२७. पुरवठा आदेशातील साहित्याचा मागणीप्रमाणे वेळेत पुरवठा केला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

अ) पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास – प्रती आठवडा ००.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत दंड आकारण्यात येईल.

आ) पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा जास्त असल्यास – प्रती आठवडा ००.५०% दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत पर्यंत दंड आकारण्यात येईल.

मात्र विलंबाने पुरवठा केलेले साहित्य स्विकारणेचे बंधन संस्थानवर राहणार नाही.

**(दी.म. मुगळीकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**



Scanned by CamScanner

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ----------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ----------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ----------------------------------------------------------------

ऑफीस ----------------------------------------------------------------

दुकान ----------------------------------------------------------------

निवास ----------------------------------------------------------------

मोबाईल नंबर ----------------------------------------------------------------

फॅक्स नंबर ----------------------------------------------------------------

ई – मेल ----------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ----------------------------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक- ----------------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे- १. ----------------------------------------------------------------

२. ----------------------------------------------------------------

६. बॅंक खाते माहिती:- १. बॅंक खाते नाव:- ----------------------------------------------------------------

२. शाखा:- ----------------------------------------------------------------

३. खाते नंबर व प्रकार:- ----------------------------------------------------------------

४. बॅंक IFSC कोड:- ----------------------------------------------------------------

(महत्वाचे:- वरील सर्व माहीती टाईप करुन ई- निविदे सोबत जोडलेली असावी- ☐

दिनांक - / /२०१९

ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का





Scanned by CamScanner

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)
अगर तत्सम शासकीय परवाना / शासकीय उत्पादक परवाना ☐

२. GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती ☐

३. पॅन कार्ड ☐

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का





Scanned by CamScanner

प्रति,
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– - श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागासाठी कार्यालयीन स्टेशनरी साहित्य खरेदीचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत. नियमाप्रमाणे बयाणा रक्कम ऑनलाईन भरलेली आहे.

ज्या साहित्याच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने साहित्याचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर पुरवठा आदेशाच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून ०५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख/DD/RTGS/NEFT द्वारे भरणा करु तसेच बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. संस्थान अटी-शर्तीप्रमाणे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व मंजूर दराने निविदा कालावधीत मागणीप्रमाणे साहित्य वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे





Scanned by CamScanner